REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# नामदेव कृत आदी तीर्थावळी समाधी

प्रा.डॉ.बाळासाहेब गार्डी
पदव्यूत्तर मराठी अध्ययन व संशोधन केंद्र, रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर.

## प्रस्तावना



आदी मध्ये ज्ञानेश्वरांच्या जीवन चरित्राची उपलब्ध अशी माहिती देण्यावर नामदेवांनी विशेष भर दिला आहे . परंतु तीर्थावळी व समाधी ही प्रकरणे अधिक उत्कटतेने लिहिली आहेत. परमार्थ साधनेत ज्ञान आणि भक्ती या दोन भुमिका मानल्या आहेत. तीर्थावळी मधील संवादातून या दोन भूमिका स्पष्ट करण्याचा नामदेव प्रयत्न करतात. हा संवाद ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या मध्ये घडलेला आहे. चरित्र विषय आणि चरित्र लेखक यांच्या मधील संवादातून ज्ञान व भक्ती यामधील एकत्वावर प्रकाश टाकलेला आहे . शिवाय चरित्र विषयी असलेली लेखकाची तन्मयवृत्ती त्यातून व्यक्त होते . नामदेवांच्या मनाचे भावनात्मक आवेग चरित्र कथनाच्या ओघात व्यक्त होतात. चरित्रातील वस्तुनिष्ठ व कालनिष्ठ रूप कथनाच्या तीव्रतेमुळे पुसले जाते . चरित्राचे कथन नामदेवाच्या भावनावेगाने रंगते. नामदेवांचे मन एका भावनाप्रधान कवीचे असल्याने ज्ञानेश्वरांचे चरित्र अलिप्तपणे कथन करू शकत नाही . ते स्वतःच्या मनाच्या मुशी मध्ये चरित्र कथेतील भाव प्रसंगांना उत्कट रूप देऊन त्यांचे कथन करते . तो एक नामदेवांचा अनुभव बनतो . चरित्र लेखकाचे मन ज्ञानेश्वरांच्या चरित्र कथेविषयी स्वतःचा अनुभव कथन करते . अभंग या माध्यमाचे ते वैशिष्ट्यच आहे . अभंग ही एक स्वगत रचना असते . ती आत्मपर असते. ज्ञानेश्वर ,नामदेव, विठ्ठल या व्यक्तीमनामध्ये कल्पकतेने प्रतीत होणारा संवाद नामदेव सहजतेने लिहितात. त्यातून वस्तुनिष्ठ चरित्र कथेचा भावार्थ कळत जातो . ही लेखन प्रक्रिया कीर्तनाशी मिळतीजुळती आहे . नामदेवांच्या चरित्रकार या भूमिकेमध्ये कीर्तनकाराचे गुण दडलेले आहेत.

चरित्र विषयाच्या जीवनातील वस्तुस्थितीचे सम्यक स्वरूप लक्षात येण्यासाठी चरित्र लेखकाला त्या वस्तुस्थितीकडे थोडे दूर सरकून पाहावे लागते . समकालीन चरित्रकार यांना असे दूर सरकणे कठीण जाते . नामदेवांना ज्ञानेश्वर चरित्र लिहिताना हे दूरत्व अंगीकारता आलेले नाही . चरित्र लेखनाची सामग्री व्यक्ती जीवनाशी निगडित असते . ती बदलत नाही . चरित्रकाराचे मन जेव्हा त्या सामग्रीतील घटकांच्या मंथनातून एकसलग एकात्म अनुभव घेऊ लागते तेव्हा मात्र या सामग्रीचे मूळ स्वरूप बदलू लागते. चरित्रकाराच्या मनाने त्या सामग्रीच्या आधाराने घेतलेले अनोखं दर्शन चरित्र कथनातून श्रोत्यांपुढे येते. नामदेवांच्या चरित्रलेखन प्रक्रिया एक सर्जनात्मक प्रक्रिया घडून येते. नामदेवांनी संकलित केलेली ज्ञानेश्वर चरित्राची सामग्री मर्यादित आहे . आत्मप्रत्ययाने त्यांनी ती समृद्ध बनवली आहे . परंतु ज्ञानेश्वर चरित्र मात्र विस्तारून लिहिले आहे .हा विस्तार सामग्रीवर भिस्त ठेवून केलेला नसून भक्ती या अष्टसात्विक भाव वृत्तीच्या वर्णनामुळे झालेला आहे . विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरू असले तरी ज्ञानेश्वर हे त्यांचे खरे गुरू . भक्तीची खरी शिकवण त्यांना ज्ञानेश्वरीतून मिळाली आहे. ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायात वर्णन केलेले परमेश्वर आणि भक्त यांच्या परस्पर संबंधातील अर्थ नामदेवांचे मन प्रत्यक्ष अनुभवीत होते . तीर्थावळीतही विठ्ठलाच्या मनातील नामदेवांविषयीच्या वात्सल्यभावनेचे चित्र त्यांनी रेखाटले आहे . खुद्द ज्ञानेश्वरांना नामदेवांविषयी ववाटणाऱ्या भावनांचे वर्णन तीर्थावळी आले आहे . ज्ञान आणि भक्ती यांमधील परस्पर संबंध ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या संवादाच्या रुपात स्पष्ट करण्याचा प्रयत्न तीर्थावळीत झाला आहे. ज्ञानेश्वर ज्ञानयुक्त भक्तीचा गौरव करतात व नामदेव विठ्ठल भक्तीचे सुख वर्णन

करतात . तीर्थावळीत विठ्ठलाचे रूप कल्पनेच्या पातळीवरून ज्ञानेश्वरांनी परमेश्वर भक्तीचे प्रेमळ नाते नामदेवांनी तीर्थावळीत प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवर वर्णन केले आहे . प्रत्यक्ष विठ्ठलाची मूर्ती ननामदेवांशी बोलते गहिवरून येते. नामदेव विठ्ठलाशी स्वतःचे मन भावना बोलून दाखवितात व विठ्ठलाच्या मनाची प्रतिक्रिया अनुभवल्याप्रमाणे वर्णन करतात. भक्तांच्या व परमेश्वराच्या मनात निर्माण होणारे भक्ती सुखाचे भाव नामदेवांनी तीर्थावळीत वर्णन केले आहेत . नामदेवांचे चरित्र अशा वेळी प्रत्यक्ष अनुभवाशी अतींद्रिय अनुभव एकरूप करते .

वाटते जड भारी /नाम्याच्या वियोगे
दाटले उद्वेग /चित्त माझे

याठिकाणी मानसिक पातळीवर अनुभवास आलेले भक्तीचे भावनात्मक कल्लोळ नामदेव चरित्रात्मक प्रकरणात वर्णन करतात. नामदेवांची चरित्रात्मक प्रकरणे यामुळे वेगळी ठरतात. तीर्थयात्रेच्या पारण्याचे वर्णन करताना त्यांनी ब्राह्मण वर्गाच्या कर्मठ वृत्तीवर व भेदाभेद विचारांवर टीका केली आहे . व त्यांना परमेश्वराच्या तोंडून उपदेश केला आहे. यानिमित्ताने वैष्णव भक्तीची आचरण रीत वर्णन केली आहे . पौराणिक वाङमयातील वर्णन पद्धतीचे संकेत योजून त्याने हा सोहळा वर्णन केला आहे . तीर्थावळी हे प्रकरण ज्ञानेश्वर चरित्राचा भाग म्हणून त्याने लिहिले ते या हेतूने की भक्तियोगाचा अनुभव सर्व संवेदनांनशी वर्णन करता यावा. प्रत्यक्षाची पातळी सोडून कल्पनेच्या पातळीवर आधार घेत त्याने हा अनुभव वर्णन केला आहे.

वेदाचे हे सार /वैराग्याचे जीवन /
चिदकाशीची खुण/ परम गुज/

ज्ञानेश्वरांच्या सहवासात तीर्थाटनाचया प्रसंग अनुषंगाने त्याला जे आत्यंतिक सुखाचे अनुभव आले त्याचे चित्र तीर्थावळीत रेखाटले आहे. तीर्थावळीच्या अखेरीस त्याने केलेली प्रार्थना विचार करण्यासारखी आहे .

नामदेवांची चरित्रात्मक लेखनाची दृष्टीही भक्ताची ,भाविकाची होती . चिकित्सकाची नव्हती . ज्ञानेश्वर यांचे चरित्र लिहिताना ज्ञानेश्वरीत प्रतिपादिलेल्या तत्त्वज्ञानाचा साक्षात्कार त्यांनी वर्णन केला आहे . ज्ञानेश्वरांची शिकवण त्यांना स्वतःच्या अनुभवाने अन्य भक्तांच्या मनावर. बिंबवावयाची होती . त्या दृष्टीने त्यांनी आत्मानुभवाची भाषा योजली आहे . चरित्र विषयक माहिती त्यांनी आदी प्रकरणात दिली आहेच.तीर्थावळीतील अनुभव अतींद्रिय असल्याने त्याची अर्थ गोडी अनुभवावयाची आहे . ती सात्विक मनाने होय. समाधी चरित्र नामदेवांच्या चरित्रलेखन पद्धतीचे सर्व विशेष प्रकट करतात . योग्याच्या जीवनात समाधीच्या प्रसंगाचे विशेष महत्त्व आहे . त्याची जीवनसाधना समाधी प्रसंगात परिपूर्ण होते. तिला उदात्तता प्राप्त होते . बेलापूर चरित्रातील स्मृती चक्रधर स्वामींच्या निर्याणाचे वर्णन जया उदात्ततेने करतात. तसेच नामदेवांनी ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताई ,निवृत्ती व चांगदेव यांची समाधी चरित्रे लिहिली आहेत . ज्ञानेश्वरांना समाधी घेण्याची प्रेरणा झालेल्या क्षणापासून समाधी चरित्राची सुरुवात केली आहे . ज्ञानेश्वर यांच्या जीवनाची सार्थकता कशात आहे हे प्रथम सांगितले आहे . व विठ्ठलाकडून समाधीची प्रेरणा झाली त्याचे वर्णन केले आहे . या ठिकाणी ज्ञानेश्वर यांच्या जीवनकार्याचा, ग्रंथ लेखनाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. त्यानंतर ज्ञानेश्वरांच्या अवस्थेचे वर्णन समाधी शास्त्राच्या परिभाषेत केले आहे . इंद्रायणीच्या परिसरात जमलेल्या संतमेळाचे वर्णन डोळ्यापुढे आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे . स्वतःच्या चित्तवृत्तीच्या बदलत्या अवस्थांचे चित्रण प्रत्येक अभंगाच्या अखेरीस केले आहे.

आळंदी क्षेत्राचे महात्म्य पौराण पद्धतीनुसार एखाद्या जुन्या कथेशी संबंध जोडून वर्णन केले आहे . सर्व समकालीन संतांचे नामोल्लेख केले आहेत . स्वतःच्या मनातील ज्ञानेश्वर विषयीच्या विरह भावनेचे उमाळे उत्कटतेने व्यक्त केले आहेत .

नामदेव समाधी प्रसंग निवेदकाच्या अलिप्त भूमिकेवरून वर्णन करीत नसून तो स्वतः त्यात मनाने वावरत असल्याचे दिसते. वर्ण विषयाशी एकरूप होऊन गेलेले त्याचे मन स्वतःच्या मनोवस्था यांची दर्शने क्रमाक्रमाने कशी उत्कटतेपत जातात त्याचे चित्र रेखाटतात. हे सारे वर्णन प्रत्यक्ष अनुभव रूपकातून उभे करते . साऱ्या शोकमग्न समुदायाशी मिसळून जावे का देहभान विसरलेल्या ज्ञानदेवांची सोबत करावी असा संभ्रम उडून जातो . ज्ञानेश्वर एकाकी झाल्याचे त्यांना दुःख होते . आळंदीला समाधीचा

योग आला याचे त्यांना सुख होते . ज्ञानेश्वरांनी दिलेला उपदेश आठवीत तो विरहाचा आकांत मांडतो . मनोमन असणारी ज्ञानेश्वरांची मूर्ती पुन्हा दिसणार नाही म्हणून ते मूक होतात . त्यांचे प्राण पाण्या वेगळ्या मासोळी प्रमाणे तडफडत . दिशा उदास होतात. जीवाची तळमळ होते . प्राण कंठाशी येतात. खंत, निराशा या भावनांनी मन भरून जाते . विविध प्रकारांनी त्यांनी आपले मन उघड करण्याचा प्रयत्न केला आहे . स्वतःच्या मनातील भावना जशा उत्कटतेने वर्णन केल्या जातात तसेच निवृत्ती ,सोपान ,मुक्ताबाई यांच्या मनाच्या शोकात्म अवस्थाही वर्णन केल्या आहेत. ज्ञानेश्वरांसाठी रचलेले समाधीचे आसन वर्णन केले आहे . ज्ञानेश्वरांना अखेरचे आलिंगन देताना निवृत्तीनाथांच्या मनाच्या अवस्थेचे रुद्ध चित्रण केले आहे. शोकविव्हळ निवृत्तीना पाहून नामदेवांचे मन परमेश्वराची करूणा भाकू लागते. अनावरतेने ते लिहितात .

बांधल्या तळ्याचा /फुटलासे पाठ /
ओघ बारा वाट /मुरडताती.

स्वतः नामदेवही निवृत्तीसारखेच दुःखी होतात. त्यांचे चरित्रकाराचे मन काही वेळा बहिरदेशी तर काही वेळा अंतरदर्शी असे बनते . ज्ञानेश्वर समाधी गृहामध्येप्रवेश करीत असतानाचे दृश्य त्यांनी विलक्षण सामर्थ्याने रंगवले आहे .

मनाचा उडालेला विलक्षण प्रक्षोभ शब्दांकित करताना त्यांची भाषा प्रतिमांची बनते . समाधी चरित्राच्या पद्धतीने नामदेवांनी सोपानदेव, चांगदेव ,मुक्ताबाई ,निवृत्तीनाथ यांची समाधी चरित्रही लिहिली. नामदेवांच्या भावकोमल वृत्तीने त्या प्रकरणांना एक अनन्यपरतंत्र रूप दिले . अभंग हे माध्यम त्यांनी चरित्र कथनाचे माध्यम बनवले . ते इतक्या सहजतेने उपाय योजिले की त्यात अभंग रचनेचे श्रम जाणवत नाहीत . प्रसंगीच्या उत्कट भावनेनेबरोबर भाषा प्रतिमांचा व रूपकांचा आश्रय करते . चरित्रातील प्रसंगांचे वास्तव चित्र आणि स्वतःच्या मनाचे भावनात्मक कल्लोळही दोन्ही एकमेकांशी मिसळून जातात . भावनेची तीव्रता अभंग पेलू शकतो . तसेच समर्थ असे कथन व प्रतिपादनही अभंगातून करता येते.

नामदेवांचे चरित्रात्मक लेखन वाचत असताना त्यात अनुभवाच्या दोन पातळ्या जाणवतात. एक प्रत्यक्ष वास्तव आणि दुसरे स्वतःच्या भाव सामर्थ्याने निर्मिलेले आंतरिक अनुभूतीचे स्वप्न वास्तव . हे दोन्ही विषय त्याच्या मनाने अनुभवलेली असतात . या दोन पातळीवर त्यांचे कवी मन विहरताना दिसते . या दोन्ही विश्वातील त्यांचे वर्णन केलेल्या अनुभूतीने खरेपणाचे सामर्थ्य लाभलेले असते. नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन त्यांना त्यांचा सहवास लाभलेला आहे . त्यामुळे वरील चरित्र विषयक सामग्रीतून साकार होणारे प्रत्यक्षात वास्तव चित्र नामदेवांच्या चरित्र लेखनाने विश्वसनीयतेचे सामर्थ्य निर्माण करीत असते. परंतु याचबरोबर विठ्ठलाशी होणारे नामदेवांचे बोलणे चालणे यांचा सुखसंवाद, हितगुज, परस्पर जिव्हाळा, प्रेम इत्यादीचे त्यांच्या मनाने गृहीत धरलेले एकती वाचतो किंवा त्याच्या कविमनाला भावलेले त्याचे स्वप्नविश्वही त्याच्या चरित्र लेखनाचा अविभाज्य भाग बनतात. या अतींद्रिय अनुभव तिच्या हाती वास्तवाचे खरेपणही मनाला भिडणारे आहे . या दोन्ही विश्वामध्ये नामदेवांचे मन एकसारखे स्वतःला शोधत असल्याचे जाणवत राहते . त्यांचे खरे खोटेपण अजमावणे कठीण आहे . किंबहुना असेही म्हणता येईल की वास्तव विश्वातील अपुऱ्या सामग्रीला अतिवास्तव विश्वातील नामदेवांचे चिंतन वेगळा अर्थ प्राप्त करून देत असते. आळंदीला इंद्रायणीच्या परिसरात ज्ञानदेवांच्या समाधीच्या क्षणी जमलेला संतमेळा तर नामदेवांना दिसतोच . त्याचे वर्णनही त्याने केले आहे. त्यात निवृत्ती ,सोपान, मुक्ताबाई यांच्या मनात दाटून आलेली विरह भावनाही त्यांना जाणवते . तिचे वेगळेपण त्यांच्या कविमनाला भावते . याखेरीज विठ्ठलाच्या ठिकाणीही भक्तां विषयी असणारे अर्थ त्याला उत्कटतेने जाणवते व त्यातून एक अद्भुत अतिवास्तवपूर्ण स्वप्नावर विश्वास त्यांच्या मनात साकारते. त्यात विठोबाकडे समाधीच्या सोहळ्याचे यजमानपद असते . राही रखुमाबाई स्वयंपाकात गढून गेलेल्या असतात व गुणवान झालेल्या ज्ञानदेवांना विठोबा घास भरवित असतात. हे सारे नामदेवांना अनुभवता आले आहे. हे विश्व नामदेवांच्या कल्पनेचे विश्व असले तरी ते चमत्कार कथेचा बंधाइतके निर्जीव नाही. ठोकळेबाजही नाही .प्राचीन चरित्रात्मक लेखनात नामदेवांनी स्वप्न वास्तवाचे एक अनोखे परिमाण दिले आहे . ज्यातून अतींद्रिय स्वरूपाचे अनुभव त्याला वास्तव अनुभवाशी जोडता आले आहेत अभंगात चरित्रलेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणून याकडे पाहता यावे नामदेवांच्या या वास्तवाला ज्ञानेश्वरांनी वर्णन केलेल्या भक्त परमेश्वर यामधील भाव संबंधाविषयी च्या चिंतनाचा आधार आहे

नामदेवांच्या चरित्रात्मक वर लेखनामध्ये तरी या स्वप्नवत अनुभवांमध्ये एक विलक्षण ताकद जाणवते त्या संवेदनांची समृद्धता जाणवते समाधी चरित्र हे प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखनाचे एक वैशिष्ट्य पर्यंत पूर्ण रूप म्हणता येईल.

सोपानदेव निवृत्ती चांगदेव व मुक्ताबाई यांची समाधी चरित्र लिहिताना नामदेवांनी काही संकेत रूढ करण्याचा प्रयत्न केला आहे. या संकेतांचे मूळ पौराणिक ग्रंथात आढळते .परमेश्वराचे स्तवन मूर्ती वर्णन परमेश्वराचे गुणवर्णन महात्मा इत्यादीवर लिहिण्याचा संकेत त्यांनी पाळला आहे. त्यांनी निर्माण केलेल्या अपूर्वा विषयीच्या कल्पना नुसार दिव्य विमानातून देवांनी समाधीचे दिव्य सोहळे पाहणे गंधर्वाचे दिव्य संगीत कुसुम वृष्टी इत्यादीची वर्णने सांकेतिक पणे केली जातात.समाधीचा अनुभव परिणामकारक बनवण्यासाठी हा असतो कीर्तन पद्धतीच्या दृष्टीने हे संकेत आले असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. नामदेव हे कवी असल्यामुळे त्यांच्या अनुभव कथनामध्ये वास्तव आणि कविमनाला आढळलेले अति वास्तव यांचा एक मेळ जाणवतो. ही दोन विश्वे एकाच अनुभवाची दर्शने असल्याने व अविभाज्य पणे एकत्रित झालेली असल्याने वेगळी करणे ही जमणे कठीण आहे.

## संदर्भ ः

1. कुलकर्णी, श्री. रं. प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा व परंपरा, मुंबई, १९७०.
2. जोग, रा. श्री. संपा. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड 1 पुणे, १९७३.
3. जोशी, प्र. न. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ , पुणे, १९७८.
4. देशपांडे, अ. ना. मराठी वाङ्मयकोश ( प्राचीनखंड ), नागपूर, १९७४.
5. पांगारकर, ल. रा. मराठी वाङ्मयाचा इतिहास, ३ खंड, मुंबई, १९३२, १९३५ , १९३९.